सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~ग्रामली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३०८ ठ. क्र. २०२
दि. २९/१२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सी.आर.पी.सी. १९७ प्रमाणे दोषारोप पाठविणेस परवानगी मिळणेबाबत आरोपी श्रीमती सुनंदा गोरख सुतार कायम मजूर यांचेविरुध्द प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दाखल गुन्हयामध्ये मे. न्यायालयात दोषारोप पाठविणेस मंजूरी देणेत आलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९-अ नुसार सदरची बाब आयुक्त अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजूरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महापालिकेला कळवील अशी तरतूद आहे. तरी सदरची बाब मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत मा. आयुक्त यांचे दि. ३०-११-१५ चे टिपणीने आलेल्या पत्राचे अवलोकन केले.

संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुख्ली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...३०९ ठ. क्र....२८३
दि. २५।२।१६ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



उजनी मेन लाईन पाणीचोरी प्रकरणात दाखल गुन्हयामध्ये सी.आर.पी.सी.१९७ प्रमाणे दोषारोप पाठविणेस मंजूरी दिल्याची बाब मा. महानगरपालिकेच्या निदर्शनास आणणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तुत प्रकरणात पोलीस निरीक्षक, टेंभूर्णी पोलीस स्टेशन यांचे आलेल्या पत्रानुसार सक्षम प्राधिकारी या नात्याने दोषारोप पाठविणेस मंजूरी देण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५९-अ नुसार सदरची बाब प्रस्तावात नमूद तरतुदीनुसार मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे निदर्शनास आणणेबाबत मा. आयुक्त यांचे दि. ५-१२-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणाची माहिती घेतली.

पाईप फिटर श्री. कापसे व रोजंदारी वाहन चालक श्री. काकडे यांना मे. कोर्टाचे निर्णयास अधिन राहून कामावर घेण्यांस मान्यता देणेत येत आहे. श्री. राठोड व्ही. बी. उपअभियंता, यांचा या प्रकरणाशी संबंध नसलेने त्यांना कामावर घेणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुख्रो/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३९० ठ. क्र. २९४
दि. १९/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



देगाव येथील मलशुध्दीकरण केंद्रातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर Tertiary Tretment करुन NTPC ला सांडपाणी देणेबाबत प्रस्तावात नमूद प्रमाणे सोलापूर शहर पाणी पुरवठासाठी उजनी धरणातून भीमानदीत पाणी सोडले जाते.सदरचे पाण्याचा प्रवाह हा नदीतून असल्याने ठिकठिकाणी शेतकरी पंपाद्वारे पाणी उचलत असतात.व पाणी जमिनीत झिरपून पाण्याची आवक अत्यंत कमी मिळते आहे.त्यामुळे पाण्याची फार मोठया प्रमाणात नासाडी होते.सबब प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित काम हे पाणी पुरवठयाशी संबंधित आहे.सदरचे काम हे अत्यंत तातडीचे असल्याने,प्रस्तावात नमूद कामाची तातडीचे व तांत्रिक स्वरुपाचे निकड लक्षात घेवून सदर कामासाठीचे जाहिर निविदा प्रसिध्दीकरणाने ई निविदा मागवून सदरहू सो.म.पा.व NTPC यांचे दरम्यान पाण्याची देवघेव करणेचे अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे,त्या अनुषंगाने मा.शासनाकडून आवश्यक ते पत्रव्यवहार करणे मा.शासनाचे निर्देशानुसार NTPC समवेत आवश्यकते करारपत्र करणे इ.कार्यवाही ठेवणेस मा.सर्ववाधारण सभेची मान्यता मिळणेकामी तसेच सदरील कामाचे अंदाजपत्रके व आराखडे (डी.पी.आर.)तयार करणेसाठी येणारा खर्च हा सन २०१५-१६ भांडवली कामे मधील अ.क्र.१३ अर्थसंकल्प पृष्ठ क्र.६ विविध योजनेसाठी डी.पी.आर.तयार करणे या बजेट सदरी टाकणेसही मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ९/१२/२०१५चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्राथमिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 399 ठ. क्र. 284
दि. 9/01/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



उजनी धरणातील पाण्याची पातळी वजा ३५ टक्केपेक्षा खाली गेलेवर दुबार पंपींग करुन पाणी उपसा करावे लागणार आहे.त्यावेळेस पाच दिवसाआड पाणी पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच भविष्यात उजनी धरणातून भीमा नदीत जलसंपदा खात्याकडून पाणी न सोडलेस भीमा पाणी पुरवठा बंद पडून फक्त उजनी धरण थेटपाईप लाईन योजनेवरच सोलापूर शहरासाठी पाणी पुरवठा करावा लागणार आहे.त्यावेळी शहरास साधारणत: ११ ते १२ दिवस आड पाणी पुरवठा करावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यानुसार ११ दिवस आड होणा-या पाणी पुरवठयाचे वेळापत्रक प्रस्तावासोबत जोडले असून,भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई सदृष्यस्थिती पाहता महापालिकेस पर्यायी उपाय योजना म्हणून टंचाई आराखडा तयार करुन त्यास मनपा सर्वसाधारण सभेची सक्षम मान्यता व बजेट तरतूद उपलब्ध करुन घेणेचे आहे.सबब प्रस्तावात नमूद बाबींचा विचार होऊन सदरचे पाणी टंचाई आराखडयाचे प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस तसेच मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर सदरचे पाणी टंचाई आराखडयास मा.शासनाची टंचाई निधीमधून तरतूद उपलब्ध होणेस्तव प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस आणि सदरचे टंचाई आराखडयास मान्यता मिळून प्रत्यक्षात किती अनुदान /निधी मा.शासनाकडून म.न.पा.स प्राप्त / उपलब्ध होईल हे निश्चित सांगता येणार नाही.तथापि येणारे कालावधीतील अपेक्षित पाणी टंचाई विचारात घेता सदरची कामे ही सक्षम मंजूरी घेऊन तातडीने चालू करणे गरजेचे असलेने मा.शासनाकडील निधीस होणारा विलंब सदरकामी तुर्तास प्रथम प्राधान्याने म.न.पा.कडील र.रु.७.०० कोटी निधी उपलब्ध होणेकामी मा.सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव सादर करणेस मा.आयुक्त यांचे दिनांक १५/१२/१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका